# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ 2039

दिनांक :- 27 JUN 2019

प्रति,
प्राचार्य,
शासकीय /अनुदानित व विना अनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था
औरंगाबाद विभाग

**विषय**:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी महाडीबीटी पोर्टलवरील नोदणीकृत संस्थांनी महाराष्ट्र शासनाच्या योजनाकरिता संस्था प्रोफाईल/शैक्षणिक शुल्क अद्ययावत करणेबाबत.

**संदर्भ** :-मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/वि.का.पत्र-२०१९-२०/२९७, दि. २१-०६-२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयी आपले सरकार पोर्टल (संकेतस्थळः http://mahadbtmahait.gov.in) मार्फत राबविण्यात येत असलेलया योजनांसाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता आपले सरकार डी.बी.टी पोर्टलवर संस्थेची माहिती (Institute Profile), अभ्यासक्रम व त्या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत /अद्ययावत करण्याबाबतची सुविधा महाडीबीटी पोर्टलवर सुरु करण्यात आली आहे.

या विभागांतर्गत सर्व संस्थांना सुचीत करण्यात येते की, आपल्या संस्थेस प्राप्त झालेल्या लॉगीन आयडीद्वारे संस्थेची माहिती (Institute Profile), तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता संस्थामध्ये सुरु असलेल्या मान्यता प्राप्त अभ्यासक्रम व त्या अभ्यासक्रमासाठी लागु असलेले सर्व प्रकारचे शुल्क अचुकरित्या व काळजीपूर्वक पोर्टलवर भरण्याबाबत व मंजूरीसाठी या कार्यालयाला ऑनलाईन पध्दतीने पाठवण्यात यावे. आपल्याकडून मान्यता देण्यात आलेल्या अभ्यासक्रम व त्याबाबतच्या शुल्क मान्यतेनुसार (Approval), योजनांचा लाभ मंजूर करण्यात येणार असल्याने अभ्यासक्रम व शुल्क तपासून मान्यता दयावी. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील.

सोबतः-वरीलप्रमाणे

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना वेबसाईवर अपलोड करण्यासाठी

Ram/sr other and office order